**Arts & Commerce College, Warwat Bakal, Tq. Sangrampur**

**Research Paper-2022-2023**

| Sr. No. | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | National education policy-2020 | Dr. R. S. Korde | Political science | Genius International multidisciplinary research journal | 2022-23 | 2279-0489 |
| **2** | Career of Women in Indian politics: An efficacy | Dr. R. S. Korde | Political science | Madhya Bharti Humanities and social science journal | 2022-23 | 0974-0066 |

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS




Volume - XI, Issue - II
February - July - 2023
English / Marathi / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.508
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - XI Issue - II February - July - 2023

ENGLISH / MARATHI / HINDI

**Peer Reviewed Refereed and**
**UGC Listed Journal No. 47100**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2023 - 7.508**
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Effective Governance and Leadership for Education Institutions`<br>**Dr. Deepa Dhananjay Sankhe** | 1-6 |
| 2 | The Revolutionary Steps towards Digital India and Problems in Changing Paradigms of NEP-2020<br>**Dr. Manjusha D. Saijare** | 7-13 |
| 3 | Holistic Learning and Role of Teacher in the Light of NEP 2020<br>**Dr. Bhavika S. Jain** | 14-18 |
| 4 | Building India's New Educational Foundation through Research and Development<br>**Dr. Krishna F. Meshram** | 19-23 |
| 5 | NEP 2020 - Changing Role of Teachers<br>**Dr. Neeta Aurangabadkar- Pole**<br>**Dr. A. N. P. P. Anantha Lakshmi** | 24-30 |
| 6 | Exploring Pre-Service Teacher's Perspectives on the National Education Policy 2020: A Review and Survey<br>**Dr. Shrutika Watkar** | 31-36 |
| 7 | A Study of Difficulties Faced by Science Teachers of Secondary Grades while Teaching Sex Education through Human Reproduction System to Grade 10th and it's Future under Gender Sensitisation at Schools under NEP -2020<br>**Miss. Shweta Patil** | 37-41 |
| 8 | A Holistic Development Approach towards Growth Empowered by National Education Policy (NEP)<br>**Dr. Padmpani Bhagwan Sawai**<br>**Ms. Saniya Ulhas Shiurkar** | 42-45 |
| 9 | A thought on Multidisciplinary Education!<br>**Dr. Prakash Laxmanrao Dompale** | 46-51 |
| 10 | An Exploratory Study on Challenges Faced by Administrative Staff of Degree Colleges in the South Mumbai Region<br>**Dr. Surekha B. Mishra**<br>**Mrs. Sajida Shaikh** | 52-59 |

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षकांची बदलती भूमिका<br>**प्रा. डॉ. जयश्री देशमुख** | १-३ |
| २ | राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतुदी - एक अभ्यास<br>**Dr. Ladaf S. K.** | ४-७ |
| ३ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याविषयी शिक्षकांचे मत<br>**प्रा. डॉ. मंगला पी. कटरे** | ८-१२ |
| ४ | २१ वे शतक : शिक्षणातील आव्हाने<br>**Mr. Atul Thakare**<br>**Dr. Rajshree Meshram** | १३-१७ |
| ५ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०<br>**Dr. Rajendra S. Korde** | १८-२४ |

# ५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

**Dr. Rajendra S. Korde**
Assitant Professor, Art Commerce College, Warwat-Bakal.

कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख मुख्यत: त्या देशाच्या शैक्षणिक धोरणाच्या निकषांवरून ठरविता येतो. शिक्षणाच्या संदर्भात साधारणत: तीन निकष महत्त्वाचे आहेत. एक - शिक्षण कुणासाठी, दोन - शिक्षण कशासाठी व तीन- ज्ञान शिक्षण व कौशल्य या घटकांना शिक्षण धोरणात काय स्थान आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा (NEP) विचार या संदर्भात करणे उचित ठरेल.

**प्रस्तावना**

२९ जुलै २०२० रोजी भारत सरकारने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP)' जाहीर केले. डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय समितीने २०१९ मध्ये NEP चा मसुदा केला होता. त्यावर आधारित 'NEP 2020' तयार करण्यात आले आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ अन्वये ६ वर्षांपर्यंतच्या मुलांची देखभाल व संगोपनाच्या प्रयत्न अशी तरतूद होती. २००२ मध्ये ८६ व्या घटनादुरुस्ती नुसार, ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलबध करुन देणे अशी तरतूद कलम २१ अ मध्ये करण्यात आली. २००९ मध्ये शिक्षण अधिकार कायदा संमत करण्यात आला. १९६८ मध्ये कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखण्यात आले. यात प्रामुख्याने त्रिभाषा सूत्र, १०-२-३ असे टप्पे आणि उच्च शिक्षणात दूरस्थ शिक्षणाची सोय या ठळक बाबी होत्या.

१९८६ मध्ये दूसरे शैक्षणिक धोरण जाहीर झाले. यात मुख्यत: प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, मुक्त शिक्षणाच्या संकल्पनेस मान्यता व तंत्र शिक्षणावर भर या गोष्टी होत्या. १९९२ मध्ये या धोरणात काही नवीन बाबींचा समावेश करण्यात आला. त्यात मुख्यत: व्यवसाय शिक्षण, साक्षरोत्तर उपक्रम, सर्व शिक्षण अभियान इ. बाबी होत्या. आता ३४ वर्षांनंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नव्याने जाहीर करुन भारतीय शिक्षण व्यवस्थेत प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत आमूलाग्र बदल सुचविलेले आहेत. आपण या NEP चा थोडक्यात आढावा पुढील तीन टप्प्यात घेऊ या.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या तरतुदी**

**अ) प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील बदल**

१. NEP 2020 मध्ये शिक्षणाचा आकृतीबंध बदलण्यात आला आहे. आज अस्तित्वात असलेला १०-२-३ हा आकृतीबंध क्रमाक्रमाने २०२३ पर्यंत रद्द होऊन त्या ऐवजी ५+३+३+४ हा नवा आकृतीबंध येईल. आज अस्तित्वात असलेली ज्युनियर कॉलेजेस क्रमाक्रमाने बंद होऊन त्यांचा समावेश माध्यमिक शिक्षणात केला जाईल.

२. पूर्व प्राथमिक शिक्षणाला शिक्षण व्यवस्थेच्या मुख्य धारेत आणले असून वय वर्षे ४ ते ८ ही पाच वर्षे प्राथमिक (अंगणवाडीच्या तीन वर्षासह) शिक्षणाची असतील, त्यानंतर ५ वी पर्यंत प्राथमिक, ८ वी पर्यंत पूर्व माध्यमिक व १२ वी पर्यंत माध्यमिक अशी रचना असेल.

३. प्रत्येक टप्प्यावरच्या शिक्षणाची उद्दिष्टे NEP मध्ये स्पष्ट करण्यात आली आहेत. वाचन, लेखन, मूलभूत गणित हा पाया प्राथमिक शिक्षणात मजबूत करण्यावर भर असून ५ वी पर्यंत मातृभाषेतून शिक्षण दिले जाईल. मातृभाषेतून ८ वी पर्यंत शिक्षण दिले जावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

४. ६ वी पासून व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव केला असून हे शिक्षण इंटर्नशिपसह दिले जाईल विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांच्या कलानुसार कौशल्य प्राप्तीचा लाभ या व्यवस्थेत मिळणार आहे.

५. पूर्वप्राथमिक शिक्षण व अंगणवाडी सेविका यांच्या अध्यापन प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम NCERT विकसित करणार आहेत. केवळ पाठांतरावर भर न देता विचारशक्ती वाढविण्यावर भर देण्यात येईल. त्यासाठी वाचनाची गोडी व आकलन क्षमता विकसित करण्यावर लक्ष दिले जाईल. शिक्षणाच्या दर्जा मूल्यांकनासाठी राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र स्थापन केले जाईल.

**ब) उच्च शिक्षणविषयक तरतुदी प्रस्तुत शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल सुचविले आहेत**

१. उच्च शिक्षणाच्या आकृतीबंधात (मूळ आकृतीबंध बदलल्यामुळे) बदल झाला आहे. म्हणजे ३+२ हा आकृतीबंध रद्द होऊन ४+२ असा बनला आहे. १२ वी पर्यंतचे माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर पदवी शिक्षण चार वर्षे आणि पदव्युत्तर दोन वर्षे असा आकृतीबंध आहे.

२. उच्च शिक्षणाचे नोंदणी प्रमाण २०३० पर्यंत ५०% करण्याचे उदिष्ट निश्चित केलेले आहे. आज ते २६.३% इतके आहे.

३. माध्यमिक शिक्षणापासूनच आंतर विद्याशाखीय शिक्षणावर भर देण्यात येणार असून, उच्च शिक्षणात कला, वाणिज्य, विज्ञान असा भेद न राहता विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार कोणतेही विषय (अर्थात, संख्या मर्यादा असेलच) निवडण्याचे स्वातंत्र्य असेल.

४. महाविद्यालयांची विद्यापीठांशी संलग्नता ही संकल्पना क्रमाक्रमाने बंद होईल. आंतरविद्याशाखीय आणि विविध विषयांचा अभ्यासक्रम असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या अधिक असेल व अशा विद्यासंकुल महाविद्यालयांना पदवी प्रदान करण्याच्या अधिकारासह स्वायत्तता दिली जाईल. ३००० पेक्षा कमी संख्या असणारी महाविद्यालये एक तर बंद होतील किंवा त्यांचे एकत्रीकरण केले जाईल. थोडक्यात, खर्चाच्या दृष्टीने न परवडणाऱ्या (Non-viable) महाविद्यालयांऐवजी, बहुविध अभ्यासक्रमाची उच्च शिक्षणसंस्था संकुले (HEIs) अस्तित्वात येतील. तसेच या उच्च शिक्षण संस्थांना (HEIs) त्यांच्या संस्थांमधून, केवळ संशोधन किंवा केवळ टीचिंग किंवा दोन्ही यातून निवड करता येईल. अशा प्रकारच पुनर्रचनेचे काम २०३५ पर्यंत पूर्ण होईल.

५. वरील प्रकारच्या बदलासाठी उच्च शिक्षण आयोग कायदा केला जाईल. राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना केली जाईल आणि सर्व राज्यांशी संपर्क ठेवून शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीकडे आयोग लक्ष ठेवून असेल. वर्तमान विद्यापीठ अनुदान आयोगाचे सर्व अधिकार राष्ट्रीय शिक्षण आयोगाला असतील. भारतीय शिक्षण व्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रथमत: जगाच्या क्रमवारीतील पहिल्या शंभर विद्यापीठांना भारतात संकुले उभारण्याची मुभा दिली जाईल, तसेच भारतातल्या क्रमवारीतील पहिल्या शंभर विद्यापीठांना परदेशात शाखा सुरु करण्याची परवानगी असेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची जमेची बाजू**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने येऊ घातलेल्या आमूलाग्र बदलामुळे अनेक चांगल्या गोष्टी शिक्षण व्यवस्थेत येतील यात शंकाच नाही. मुख्यत:

१. पूर्व प्राथमिक शिक्षणाला औपचारिक शिक्षण व्यवस्थेला जोडून घेतल्यामुळे, पूर्व प्राथमिक शिक्षणासंबंधीचा गोंधळ व अराजक संपुष्टात येणार आहे. गल्लीबोळातून केजी शिक्षणाचा माजलेला पसारा, पैशाचा बाजार आणि गुणवत्तेचा बोजवारा हा प्रकार बंद होऊन, वयाची तीन वर्षे पूर्ण करणाऱ्या पालकांना त्यांच्या क्षमता वाढविणाऱ्या समान अभ्यासक्रमातून शिक्षणाची संधी मिळेल.

२. इयत्ता तिसरीपर्यंत विद्यार्थ्यांची साक्षरता आणि गणिती ज्ञान यांचा विकास घडवून आणण्यावर भर दिला आहे. हा पुढील शिक्षणाचा पाया आहे. २०२५ पर्यंत ही मूलभूत साक्षरता सार्वत्रिक करण्याचे उद्दिष्ट आहे. वाचनाची सवय विकसित करण्यासाठी पुस्तक प्रवर्धन धोरण आखण्याचे ठरले आहे. सार्वत्रिक लसीरकरण, मातृभाषेतून शिक्षण अशा अनेक बाबी NEP च्या जमेच्या बाजू आहेत.

३. कौशल्य विकास, व्यावसायिक शिक्षण, आंतरविद्याशाखीय धोरण, बहुद्देशीय शैक्षणिक संकुले इ. वर दिलेला भर तसेच व्यावसायिक शिक्षणासाठी इंटर्नशिप तरतूद यामुळे अनुभवातून शिक्षण मिळणार आहे. केवळ पाठांतरावर भर न देता विचार करण्याच्या व विश्लेषणाच्या क्षमता वृद्धिगंत करण्यावर उच्च शिक्षणाचा भर आहे.

४. शालेय शिक्षणात विद्यार्थी शिक्षण प्रमाण ३०:१ व मागासलेल्या भागासाठी २५:१ असे सूत्र स्वीकारले जाणार आहे. उच्च शिक्षणात संशोधनाला वाव देण्यासाठी नॅशनल रिसर्च फौंडेशन निर्माण केले जाणार आहे. भाषा शिकताना कोणत्याही भाषेची सक्ती असणार नाही किंवा कोणत्याही भाषेला विरोध असणार नाही. टीचर एज्युकेशनसाठी चार वर्षांचा एकात्मिक पदवी अभ्यासक्रम असेल. २०३० नंतर टीचर एज्युकेशनचा कोणताच जुना अभ्यासक्रम अस्तित्वात असणार नाही.

५. शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञानाच्या सातत्याने वापर होण्यासाठी नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम स्थापन करण्याची तरतूद, शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापर व त्याचे अद्ययावतीकरण करणे शक्य होणार आहे. हा महत्त्वाचा फायदा आहे. NEP २०२० च्या या काही ठळक जमेच्या बाजू निश्चितच लक्षात घ्यायला हव्यात.

**टीकात्मक परीक्षण**

कोणत्याही राष्ट्राचे शैक्षणिक धोरण हे त्या राष्ट्राच्या विकासाची पुढील दिशा व युवा पिढीचे भविष्य निश्चित करीत असते. या अर्थाने हे धोरण करताना मा. पंतप्रधानांनी व संबंधित मंत्र्यांनी देखील हे शैक्षणिक धोरण भविष्यवेधी युवा घडविणारे आहे असे म्हटले आहे. नीती आयोगाच्या प्रमुखांनी प्रस्तुत धोरण नवीन भारत उदयाचे आहे असे म्हटले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित संगणकीय व्यवस्थेच्या वापरामुळे भारताचा प्रवास चौथ्या औद्योगिक क्रांतीकडे होईल असे सांगितले जाते. २०१४ पासूनच्या सरकारच्या सर्वच क्षेत्रांतील धोरणांच्या परिप्रेक्ष्यात या धोरणाचा विचार केल्यास प्रस्तुत धोरणातील काही बाबी आत्यंतिक आदर्शवादी, आक्षेपार्ह व अव्यवहार्य वाटतात. त्यामुळे त्यांचा पुनर्विचार होणे गरजेचे वाटते. NEP ची स्तुती आणि टीका ही प्रामुख्याने दोन पातळीवरून होत आहे. एक म्हणजे पक्षीय / राजकीय दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या धोरणाला अनुकूल असणारे राजकीय नेते व पक्ष, हे शैक्षणिक धोरण कसे उपयुक्त आहे व राष्ट्रविकासाला पोषक आहे याबद्दल बोलत आहेत. याउलट केंद्र सरकारच्या धोरणाला प्रतिकूल असणारे राजकीय नेते / पक्ष विविध पद्धतीने टीका करीत आहेत. दुसरे म्हणजे अभ्यासक व तज्ज्ञ यांच्याकडून होणारे विश्लेषण होय. (येथेही सरकारचे समर्थन व विरोध करणारे अभ्यासक आहेतच.) या व इतर अनेक समीक्षेचा एकत्रित विचार करता NEP मधील काही गंभीर व शिक्षण व्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणाऱ्या काही बाबी लक्षात येतात. त्या अशा -

१. डॉ. कस्तुरीरंगन समितीचा मूळ अहवाल खूपच सविस्तर होता. प्रस्तुत धोरणाचा मसुदा केवळ ६६ पानांचा आहे. याचा अर्थ, समितीच्या सर्व शिफारशी खुल्या केलेल्या नाहीत. धोरण मंजूर करण्यापूर्वी सरकारने शिक्षणाशी संबंधित घटक व लाभार्थी यांच्याशी चर्चा केली नाही, हे लोकशाही विरोधी वर्तन आहे. शिक्षण हा विषय समवती सूचीमध्ये असल्यामुळे राज्यांशी चर्चा करणे अपेक्षित होते.

२. शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये भारतीय प्राचीन परंपरा, मूल्ये, संस्कृती यांचा उल्लेख असून घटनेला अभिप्रेत असलेली मूल्यव्यवस्था संवर्धित करण्यावर भर दिला आहे. परंतु धर्मनिरपेक्षता या मूल्याचा कुठेही उल्लेख नाही. त्रिभाषा सूत्रात संस्कृतीचा समावेश व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या सगळ्याच गोष्टींमध्ये विरोधाभास दिसून येतो..

३. विद्यमान सरकारची सगळीच धोरणे सर्वच क्षेत्रोच केंद्रीकरण करण्याकडे झुकतात. भारतीय संघराज्य व्यवस्थेला अपायकारक अशी ही दृष्टी आहे. शिक्षण हा विषय समवती सूचीमध्ये येतो. याचा फायदा घेऊन प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत नियंत्रण केंद्र सरकारकडे राहील अशा तरतुदी प्रस्तुत धोरणात करण्यात आल्या आहेत. सर्वच क्षेत्रात सारखेपणा आणण्याचा हा अट्टाहास भारताची विविधतेतील एकता ही वीण उसवून टाकेल अशी भीती वाटते. समान दर्जा व सारखेपणा या दोन गोष्टी वेगळ्या आहेत.

४. शिक्षण संकुले निर्मितीचा प्रश्न फारच गंभीर आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी शाळा संकुले निर्माण करण्यावर या धोरणाचा भर आहे. म्हणजेच केंद्रीकरण बरोबरच व्यापारीकरणावर भर आहे. (आज आपण

शिक्षणाचे बाजारीकरण झाल्यामुळे चिंता व्यक्त करतो, परंतु NEP दुसऱ्या मार्गाने तेच करीत आहे.) ही शाळा संकुले ५ ते ७ कि.मी. परीघात असणार आहेत. म्हणजे विद्यार्थ्यांच्या वाहतूक व्यवस्थेपासून सुरक्षिततेपर्यंत अनेक प्रश्न निर्माण होतील. शाळा घरापासून दूर असेल तर मुलींना कोण शिकविणार?

कोठारी आयोगाने सुचविलेली शिक्षण सहकार्य ही संकल्पना NEP च्या संकुलांपेक्षा खूपच वेगळी होती.

जि. प. / पं. स. / नगरपालिका यांच्या शाळांचे महत्त्व कमी करून खाजगी व्यापाऱ्यांच्या हातात ही शैक्षणिक केंद्रे देणे योग्य नाही. सर्वांना शिक्षण या ध्येयातून गाव तेथे शाळा किंवा वस्ती तेथे शाळा ही संकल्पना राबविली गेली. त्याला हरताळ फासून अशा पद्धतीने जनसामान्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणे योग्य नाही. मोलमजुरी करणाऱ्या आई-वडिलांना घरकामात मदत करून गावातल्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना आपण शिक्षणापासून दूर ठेवणार आहोत काय? परिसरतल्या शाळांनी मूलभूत सेवांसाठी परस्पर सहकार्य करणे ही व्यवस्था अधिक योग्य असेल. शाळा हे खर्चाच्या दृष्टीने न परवडणारे युनिट असा विचार कृतघ्नपणाचा व अदूरदर्शीपणाचा आहे.

५. उच्च शिक्षणाबाबतही शिक्षण संकुले ही संकल्पना संशयास्पदच वाटते. प्रत्येक (किंवा एकल) कॉले Viable unit नाही असा NEP चा समज आहे. शिक्षणाबाबतचे सरकारचे एकूण धोरण व्यापारीकरणाचे व खाजगीकरणाचे सुरुवात केव्हाच झालेली आहे. सर्व प्रकारच्या विना-अनुदानित महाविद्यालयांकडून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. (काही अपवाद आहेत. ) विद्यार्थ्यांच्या शुल्कामध्ये समानता नाही. गुणवत्तेबाबत तर सगळा आनंदच आहे. कोणत्याही सुविधा नसताना महाविद्यालये चालविली जातात. एकूण चित्र फारसे आशादायक नाही. कदाचित, यावरून निष्कर्ष काढून NEP ने शिक्षण संकुलाचा उपाय सुचविला असावा. परंतु रोगापेक्षा इलाज भयंकर अशी अवस्था होण्याची शक्यता आहे. आणखी एक महत्त्वाची अडचण अशी की, आंतर विद्याशाखीय शिक्षण देण्याची क्षमता सर्वच महाविद्यालयांची नाही. वेगवेगळ्या संस्थांद्वारा चालविली जाणारी महाविद्यालये एकत्रित येण्यात खूपच आहेत. दूरवरच्या भागांत उघडणत आलेल्या महाविद्यालयांचे काय? ती बंद पडण्याची शक्यताच जास्त.

युरोप-अमेरिकेची नक्कल करण्याचे हे धोरण भारतीय परिस्थितीला तूर्त तरी उपयुक्त नाही. उच्च शिक्षणाच्या कॉर्पोरेटीकरणामुळे ते केवळ श्रीमंतांच्या आवाक्यता राहील व बहुजन त्यापासून वंचित होईल ही रास्त भीती आहे. शिक्षण संकुले अस्तित्वात आली तरी विद्यमान महाविद्यालये बंद होणार नाहीत याची काळजी घेणे महत्वाचे आहे. थोडक्यात, धनदांडग्यांनीय चालविलेली शिक्षण संकुले (की शिक्षणाची दुकाने) असे उच्च शिक्षणाचे स्वरुप होईल. बुद्धिमत्त असूनही माध्यमिक पातळीपर्यंत मिळणारे कौशल्य / व्यावसायिक शिक्षण घेऊन पोटापाण्याची वाट धरावी लागेल. आज उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेतून घेण्याची सोय आहे (अगदी पीएच.डी. पर्यंत) ती हळूहळू कमी होत जाईल. परिणामत: ग्रामीण आदिवासी भागांतल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून दूर रहावे लागेल.

६. आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीय शिक्षण, ऑनलाईन एज्युकेशन इ. बाबींवर NEP चा भर आहे. हे सगळे व्हायला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित शिक्षकांची गरज भासेल त्याचे काय? मोठमोठ्या संस्थाचालकांच्या शिक्षण संकुलांतुन कदाचित या सोयी उपलब्ध होतील. परंतु त्यासाठी द्यावे लागणाऱ्या शुल्काचे काय? (नुकताच झालेला मुंबई विद्यापीठाचा ऑनलाईन परीक्षा गोंधळ लक्षात असेलच)

७. आणखी महत्वाच्या दोन बाबी एक म्हणजे, नवीन शिक्षण धोरण राबविण्यासाठी सरकार (केंद्र की राज्ये) किती व कसा खर्च करणार आहे याबद्दल NEP मध्ये खुलास आढळत नाही. पुढील दहा वर्षात शिक्षणावर (केंद्र व राज्ये मिळून) २०% पर्यंत खर्च करणार असे म्हटले आहे (म्हणजे दरवर्षी २% काय?) शिक्षणावरील खर्चाबाबत NEP मोघमच आहे. शिक्षणाला पैसा कमी पडू दिला जाणार नाही असे मोठमोठ्या शब्दांमध्ये सांगितले जाते. आज एकट्या महाराष्ट्रात १०००+ प्राध्यापकांच्या आणि सुमारे ४०० प्राचार्यांच्या जागा रिक्त आहेत. राष्ट्रीय पातळीवरची आकडेवारी कितीतरी जास्त आहे. अनुदानित व विना अनुदानित धोरण चालू राहणार आहे काय, याबद्दल धोरणात स्पष्टता नाही. प्राध्यापकांच्या व कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्त्याचे काय? दोन्ही प्रकारच्या शिक्षण संस्थांमध्ये वेतन समानता असणार आहे काय? या व अशा अन्य प्रश्नांची उत्तरे NEP ला द्यावी लागतील.

थोडक्यात, कॉर्पोरेट क्षेत्राला किंवा खाजगी क्षेत्राला शिक्षण व्यवस्था आंदण देण्याचे प्रस्तुत धोरण योग्य नाही. शिक्षण देण्याची आपली जबाबदारी झटकता कामा नये. शिक्षण कुणासाठी याचे उत्तर घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी, असे हवे. शिक्षण कशासाठी, याची आदर्श उत्तरे अनेक आहेत, परंतु सगळ्यात महत्त्वाचा हेतू शिक्षण उपजीविका व विकासासाठी जास्त महत्त्वाचे आणि तिसऱ्या निकषानुसार-ज्ञान, शिक्षण व कौशल्य या गोष्टी वेगळ्या काढता येणार नाहीत. त्यामुळे या तिन्ही गोष्टींचा योग्य ती सांगड घालणे व समतोल साधणे महत्त्वाचे आहे. NEP चा हेतू व आकृतीबंध चांगला असला, तरी योग्य ती आर्थिक तरतूद व अपेक्षित बदलांसह परिणामकारक अंमलबजावणी झाल्यास NEP चे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

**साभार पोच**


- डॉ. सुरेद्र बारलिंगे विचार व कार्य विशेषांक, विचारशलाका, जुलै २०२० ते मार्च २०२०, संपा. डॉ. नागोराव कुंभार.
- एच. एम. देसरडा (२०१९), समता मूलक शाश्वत विकासाची दिशादृष्टी - शेती, पाणी, पर्यावरण, युनिक फौंडेशन, पुणे.
- बाबूराव गायकवाड (२०२०), चऱ्हाट, मंजुळ प्रकाशन, पुणे.
- दिनकर पाटील (२०१९), महाराष्ट्र कॉंग्रेसची वाटचाल (१९४७-२०२०), चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, म. बसवेश्वर विचारविश्व विशेषांक, विचारशलाका, वर्ष ३४, (ऑक्टोबर १९ ते जून २०२०) संपा. नागोराव कुंभार.

- विश्वनाथ शिंदे (संपा) (२०२०), म. जोतीराव फुले यांचे वारसदार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
- सुनीता सावरकर, (२०२०), खानदेशातील भिल्ल आदिवासी आणि आंबेडकरी चळवळ, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
- विलास रणसुभे (२०२०), कोरोना-मुस्लिम हिदूंना केलेली मदत, अनेक प्रतिष्ठान, कोल्हापूर.
- संदीप पाटील व भारत भूषण गिरी (२०२०), नोवेल कोवीड, पद्मभूषण प्रकाशन, कोल्हापूर.
- पन्नालाल सुराणा (२०२०), आर्थिक मंदीवर मात करण्यासाठी समतावादी विकास धोरण अवलंबवावे, समता प्रकाशन, आसूता. परांडा, जि. उस्मानाबाद.
- बाबूराव रोकडे (२०२०), जसं घडलं तसं, शब्द शिवार प्रकाशन, सोलापूर.
- विष्णू पावले (२०२०), पधारो म्हारो देश, अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे.

2022 · 3

UGC CARE JOURNAL
ISSN: 0974-0066

83
January-June: 2023
Vol. 83, No.06

75
आज़ादी का
अमृत महोत्सव

# मध्य भारती

मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका

# मध्य भारती

## (MADHYA BHARTI)

### Humanities and Social Science Journal

ISSN No. 0974-0066

UGC CARE (Group I) Journal

**(Volume 83, No. 06, January-June: 2023)**

**Editor in Chief**

Prof. (Dr.) Ambikaadas Sharma

**Editor**

Prof. Bhawatosh Indrguru

Prof. Brijesh Srivastava

Dr. Aashutosh Mishra

**Volume Editor**

Dr. Chhabil Mehar

**Dr. Harising Gaur University**

**Sagar (MP) – 470003**

Email – madhyabharti2016@gmail.com

# मध्य भारती (MADHYA BHARTI)

मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका

अंक - 83, क्र. 06, जनवरी-जून:2023
ISSN: 0974-0066 (पूर्व-समीक्षित अर्धवार्षिक शोध-पत्रिका)
डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय, सागर
UGC CARE - Group I (Multidisciplinary Journal)
(Print Only)

प्रकाशित रचनाओं के अभिमत से प्रकाशक या संपादकों की सहमती अनिवार्य नहीं है तथा यहाँ प्रकाशित आलेखों की प्लेगारिजम (Plagiarism) संबंधी शुचिता की जिम्मेदारी लेखकों की है|

सम्पादकीय पत्र व्यवहार
मध्य भारती
डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय
सागर (म.प्र.)-470003
ई-मेल: madhyabharti2016@gmail.com

आवरण: डॉ. छबील मेहर

मुद्रण
अमन प्रिंटर्स
सागर - 470002

UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

स्वातंत्र्योत्तर काळातील महिला उद्योजकांची दशा आणि दिशा ......47
प्रा. डॉ. बी. एस. भालेराव

स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्रीयांचे शिक्षण क्षेत्रातील वाटचाल ......51
प्रा. डॉ. भामरे नानजी दगा

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील तत्त्वज्ञान ......55
डॉ. दीपक निवृत्ती बावस्कर

A STUDY OF WOMEN EMPOWERMENT IN NANDURBAR DISTRICT THROUGH WOMEN SELF HELP GROUPS ......58
Dr. G. M. Morey

REPRESENTATION OF WOMEN'S STRUGGLE THROUGH VARIOUS ROLES IN POST-INDEPENDENT INDIAN ENGLISH NOVEL ......64
Dr. Jitendra B. Patil

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान ......67
डॉ. कल्पना दिलीप भारंबे

जळगाव जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून स्मिता वाघ यांनी केलेले कार्य - एक अभ्यास ......72
डॉ. किशोर शिवलाल पाटील

WOMEN IN TRADE AND INDUSTRY IN POST-INDEPENDENCE ERA : HINDRANCES AND THEIR REDRESS ......77
Dr. Mahendra U. Ingole

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण विकासात महिलांची भूमिका एक अध्ययन ......80
प्रा. डॉ. नितीन रामदास वडगुजर

GOURADEVI: THE UNSUNG TRIBAL LEADER OF THE CHIPKO MOVEMENT (1925-1991) ......84
Dr. Prakash M. Masram

अनाथांची आई : सिंधुताई सपकाळ ......88
डॉ. आर. आर.पाटील

CAREER OF WOMEN IN INDIAN POLITICS: AN EFFICACY ......91
Dr. Rajendra S. Korde

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चित्रकर्त्या/ शिल्पकर्त्या यांचे कलाक्षेत्रातील योगदान ......94
डॉ. राजेश्री कुलकर्णी

मध्य भारती (Madhya Bharti)
मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका
UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

# CAREER OF WOMEN IN INDIAN POLITICS: AN EFFICACY

**Dr. Rajendra S. Korde,** Assistant Professor, Arts & Commerce College, Warwat (B)

**Abstract:**

India has a long past civilization and in every stage of history women constitute half of its population; but their position is society is not the same in all ages of history. Their position has been variously estimated and diametrically opposite views are in current regarding their place in different stages of India civilization. Women are frequently casual entrants into stream of politics. Indian democracy will become more meaningful when ordinary women can take part in political deliberations and prove themselves stronger than men. Therefore, the author would like to recommend strongly that let us have legislation on resizing of the legislative institutions in view of the Cube Root Law as articulated in this article.

**Introduction:**

Present human society speaks of man's dominance over women. The position of women in India has taken a severe beating in the last few decades. It is a grave irony that on one side women in India are charting the path of success along with their male counterparts, while simultaneously; they are being subjected to all kinds of physical and mental abuses. The story of male dominance on one hand and efforts for women's equality on the other has also been an established fact in Indian society. In the existing scenario, even talented women cannot stay in politics on.

The cube root law of assembly-size is applicable to first or only chamber of the country. It says that assembly size is approximately equal to the cube root of the country's population, because this size minimizes the workload of a representative. This quantitatively predictive logical model agrees with the world averages as tabulated above. It reveals that majority of the countries like Algeria, Myanmar, Cuba, Egypt, Ethiopia, France, Germany, Greece, Hungary, Italy, North Korea, Mexico, Nepal, Poland, South Africa, Sudan, Sweden, Thailand, Turkey, UK, Vietnam are having their actual strength of the lower house more than the cube root of their population. Even China is having more than doubled the strength of its lover house than that of cube root of its population. China's foresight of having more number of members of the lower house which represents the entire population of the country is really appreciable. Although, the modern age is characterized by the tremendous advancement in the means of communication and transportation, the representatives must be in a position to have personal contacts with the electorates whom he or she represents in the real term of representative democracy. Some countries like Afghanistan, Argentina, Bangladesh, Brazil, Chanada, Indonesia, Iraq, Japan, Pakistan, Russia, Spain, Shri Lanka, USA are having the strength of their lower house not exactly equal to the cube root of their population, but very nearer to the cube root of the their population Graph-1 reveals that the deficit of lover house as compared to the cube root of population in these countries is below 100, which can be termed as below tolerance. However, India is far away, because the present strength of the LokSabha is 545 and the cube root of its present population comes to 1080, showing the deficit of 535, which far-off tolerance.

In fact, the present strength of the LokSabha should be 1080 in view of the aforesaid cube-root model. If women are to be represented in the parliament in realistic sense, all the constituencies of LokSabha should be made dual-member electing one male and one female by the electorates in place of single member. Thus, the strength of the LokSabha would be 1090(545men and 545 women). By 2018, the population of India will be 1,298,041,000 taking into account the present growth rate of the population and the cube root of this population number will be 1090, exactly the same as an expected strength of the LokSabha by fulfilling the cube root law.

In other way, constituency magnitude can be calculated by a formula $M=P^4/S$, where M is the Constituency Magnitude, P is the number of National Parties and S is the Strength of Lower House. The number of national political parties participated in the general election of 15th LokSabha is 7 and the

strength of LokSabha as envisaged out of Cube Root Law is 1090. So, by putting the values of P and S in the above formula, we get Constituency Magnitude equal to 2.2, that is approximately 2. That's why we need to make each constituency to be a dual member constituency.

Graph-2 illustrates the actual strength of lower house against the cube root of population is selected world countries in 2014, which reveals the fact that India is having major deficiency in the strength of the lower house (LokSabha) as comparted to rest of the countries of the world. The present deficit of the LokSabha is about 49.54 per cent and by 2018 this deficit would be about 50 per cent.

Under the provision of the India Constitution (Article 81) the maximum strength of the Lok Sabha is envisaged 545. When the Constitution was drafted, the population base might have been considered of the census year 1941. The population of India in 1941 was 318,660,580 and the cube root of this number omes to 683, which is nearer to the strength of LikSabha i.e.545. In view of increased population during last seven decades, the strength of the Lok Sabha has not been reviewed so far. So, the time has come to review the size of Lok Sabha and increase it to 1090 giving equal share to women, since they constitute about half of the population.

The representative democratic structural principal emphasizes that there should be a proportion between the representative and the represented. Although this figure varies from country to country, the universally accepted fact is that the size of population being represented by a representative in the legislature should be a moderate one. Presently, some countries are having this figure less than one lac like Cuba (18000), Greece (36000), Algeria (83000), Italy (96000), and UK (98000). The countries having this figure more than one lac but less than two are Afghanistan (105000), France (114000), Myanmar (117000), Germany (130000), and South Africa (135000). In Mexico, a representative represents a population size of approximately 240000, in Japan 265000, in Brazil 396000, in China 458000 and in USA 734000. However, in India a representative represents a population size of approximately 2318000, far more than any other country in the world which is not justifiable. In 1952, when the general elections for the 1st LokSabha were held, each representative was representing a population size of about 662500 whereas when the Constitution was drafted it was about 584700. Presently, this figure has enlarged to 2318000. So, if the strength of LokSabha is increased to 1090, the population size each representative representing will be 1160000, which is still higher that what USA has at present.

Let all the constituencies of LokSabha and State Assemblies be dual-member constituencies without disturbing physical boundaries of the existing constituencies; and elect two members from each onstituency – one male and one female. This will increase the strength of lower house twofold with equal male and female members confirming mirror representation, which is the need of the hour. Thus, the strength of lower house would be 1090 in consonance with Cube Root Law and each representative would be representing a moderate population size of 11.60 lac, whereas in China, it is 4.58 lac and USA 7.34 lac. Someone may pose a question as how to accommodate 1090 MPs in the House and how to conduct sessions of the House with this huge number of MPs. One may not overlook that China is accommodating 2987 members and conducting sessions successfully, then why India not. Some interim alternative arrangements can be made and then permanent solutions can be resolved in the due course of time. As a result of this, political parties will also compulsorily mobilize equal number of male and female contestants and thus, political parties will also fulfill mirror representation within the party.

**References:**

1. Aparna Chatopadhya, Aspects of India History and Culture, KitabMahal, Allahabad, 1990
2. Medhal Nanivadekar, Duel-Member Constituencies : Resolving Deadlock on Women's Reservation, Economic and Political Weekly, October 25, 2003
3. Mona Lena Krook, reformuing Representation : The Diffusion of Candidate Gender Quotas Worldwide, Politics & Gender, Vol.2No.3, 2006
4. NirojSinha (ed.), Women in India Politics : Empowerment of Women Through Political Participation, Gyan Publishing House, New Delhi 2000

UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

5. Ramesh C. Mishra, Role of Women in Legislatures in India : A Study, Anmol Publications, New Delhi, 2000
6. Rein Taagepera and Mathew Shugart, Seats and Votes : The Effects and Determinants of Electoral Systems, Yale University Press, London, 2007
7. Rein Taagepera, Prediciting Party Sizes : The Logic of Simple Electoral Systems, Oxford University Press, Oxford, 2007
8. Vinita Kaul, Women and the Wind of Change, Gyan Publishing House, New Delhi, 2000